**CNR No. MHRG040003362024**

## दिवाणी चौकशी अर्ज क्र. २०१/२०२४ मधील निशाणी ११ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ९ प्रमाणे मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, दि. २०/०२/२०२५ रोजी निशाणी क्र. ९ हा मुळ अर्जात दुरूस्ती करण्याचा अर्ज मंजूर झालेला असून मागील तारखेस फाईल न मिळाल्याने दुरूस्ती करता आली नाही. सदरहू दुरूस्ती करणे आवश्यक असून मुळ अर्जात निशाणी क्र. ९ प्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

३. अभिलेखाचे अवलोकन करता व अर्जदार यांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, अर्जदारांनी दि. ०९/०१/२०२५ रोजी मुळ अर्जात दुरूस्ती करण्याकरिता अर्ज निशाणी क्र. ९ अन्वये दाखल केला. सदरहू अर्जावर दि. २०/०२/२०२५ रोजी आदेश करण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ९ प्रमाणे मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

अर्जदारांना मुळ अर्जात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR

Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.04.08 17:36:04 +0530

पनवेल
दिनांक ०७/०४/२०२५

(ए.एस. बडगुजर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल